FORM 'H' / नमुना 'ह'

( See rule 17 / नियम १७ पहा )

# CERTIFICATE OF REGISTRATION

## नोंदणीचे प्रमाणपत्र

सत्यमेव जयते

THE INDIAN PARTNERSHIP ACT, 1932
(ACT NO. IX OF 1932)

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२
( सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ )

Registration No NG000003328

It is certified that a firm by name " **KELZARE BUILDERS AND DEVELOPERS** " with its head office at **PLOT NO. 17, ROAD NO. 6 , BAJRANG NAGAR , MANEWADA ROAD , NAGPUR , Nagpur(Urban) , Nagpur , Maharashtra , 440027. India**
has this day been duly registered under The Indian Partnership Act, 1932 (Act No. IX of 1932).

यादवारे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, **प्लॉट नं. १७ , रोड नं. ६ , बजरंग नगर , मानेवाडा रोड , नागपूर , नागपूर (शहरी) , नागपूर , महाराष्ट्र , ४४००२७.**
**India**

येथे मुख्यालय असलेल्या **" केळझरे बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स "**

या नावाच्या संस्थेची **31 May, 2017** या दिवशी भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा अधिनियम क्रमांक ९) अन्वये योग्य रीतीने नोंदणी करण्यात आली आहे.

Given under my hands this **31 May, 2017**

दिनांक **31 May, 2017** of या दिवशी माझ्या सहीने देण्यात आले.

SEAL OF THE ASSTT. REGISTRAR OF FIRMS NAGPUR

01.06.17

**Asstt. Registrar of Firms NAGPUR**

Registrar/Deputy/Assistant Registrar of Firms Mumbai/Pune/Nagpur/Aurangabad.

निबंधक/ उप सहायक निबंधक भागीदारी संस्था, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2016 ◑

NAGPUR
Z 837686
17 NOV 2016
Stamp Head Clerk / Sr. Clerk



## —: भागीदारी पत्र :—

सदर भागीदारी पत्र, नागपुर येथे दिनांक ०९/१२/२०१६ रोजी खालील भागीदारांमध्ये तयार करण्यांत येत आहे.

१) श्रीमती जयवंताबाई वि. नागो केळझरे,
वय : ७० वर्षे, धंदा : शेती,
रा. १७, बजरंग नगर, मानेवाडा रिंग रोड,
नागपूर–४४००२७,

२) **कु. यशोदाबाई नागो केळझरे** (लग्ना आधिचे नाव)
**सौ. यशोदाबाई क्रिष्णराव भित्रे** (लग्ना नंतरचे नाव)
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती,
रा. डब्ल्यु सी एल एरीया हाऊस्पीटल कॉलनी,
लालपेठ, चंद्रपूर–४४२४०४

३) **कु. मंजुषा उर्फ मंजु नागो केळझरे** (लग्ना आधिचे नाव)
**सौ. मंजुषा उर्फ मंजु रामभाऊ ढाकणे** (लग्ना नंतरचे नाव)
वय : ५० वर्षे, धंदा : शेती,
रा. प्लॉट नं. ११५८, सातगाव, मसाळा,
बुटटीबोरी, जि. नागपूर–४४११०८

४) **श्री. विनोद नागो केळझरे,**
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती,
रा. १७, बजरंग नगर, मानेवाडा रिंग रोड,
नागपूर–४४००२७,

५) **श्री. मनोज नागो केळझरे,**
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,
रा. १७, बजरंग नगर, मानेवाडा रिंग रोड,
नागपूर–४४००२७,

६) **श्री. प्रमोद नागो केळझरे,**
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती,
रा. १७, बजरंग नगर, मानेवाडा रिंग रोड,
नागपूर–४४००२७,

ज्याअर्थी वर नमुद भागीदारांनी संपूर्ण विचार करून इच्छेने व आपसात ठरवून व्यवसाय करण्याचे ठरविले व त्याचप्रमाणे **"केळझरे बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स"** या नावाने संस्था स्थापीत करण्याचे ठरविले. त्याअर्थी वर उल्लेखीत भागीदारांनी, सदर भागीदाराचे शर्ती व अटी लिखित स्वरूपात नमूद करण्याचे ठरविले आहे.

१) सदर भागीदारी संस्थेचा व्यवसाय दिनांक ०९/१२/२०१६ या दिवसापासून स्थापीत झाल्याचे घोषीत करण्यांत येत आहे.

२) सदर भागीदाराचा व्यवसाय हा **"केळझरे बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स"** या नावाने स्थापीत करण्याचे ठरविले आहे व यातील भागीदारांच्या सहमतीने दुसरे एखादे नाव ठेवण्याची तरतूद आहे.

३) सदर भागीदाराचा **व्यवसाय** : हा शेतजमीन (कृषक व अकृषक) विकत घेणे, भूखंड विकत घेणे, विकणे, गैरकृषक करणे, मोजणी करणे, विकसीत करणे, लेआऊट टाकणे व विकसीत करून संभावित खरेदीदारास विकणे, सदनिका बांधणे, नगरी बांधणे, नगर रचना विभागाकडून तसेच ना.सु.प्र यांच्या कडुन योग्य तशी मंजूरी घेणे, नगर रचना विभागाकडून लेआऊट मंजूर करून घेणे, लहान – मोठे भुखंड विकत घेवून विकसीत करून त्याची विक्री करणे, दोन मजली सदनीका आणि एका पाठोपाठ घरे बांधणे, शेतात घरे बांधून विकने, बांधकाम करून देणे इत्यादी प्रकारे राहील आणि भागीदार आपसांत वेळोवेळी भागीदारीच्या फायदयाच्या दृष्टीने आपसी इतर उदयोगधंदे व कामे सुरू करू शकतील.

४) सदर भगीदारी संस्थेची गुंतवणूक रक्कम **एकूण रूपये ५०,०००/– (अक्षरी रूपये पंन्नास हजार फक्त)** जी की भागीदार क्रं. १ ते ५ यांनी रू. ८,३३३/– (अक्षरी रूपये आठ हजार तीनशे तेहत्तीस फक्त) व भागीदार क्रं. ६ यांचे रू. ८,३३५/– (अक्षरी रूपये आठ हजार तीनशे पस्तीस फक्त) असे मिळून **एकूण रूपये ५०,०००/– (अक्षरी रूपये पंन्नास हजार फक्त)** त्यांना येणाऱ्या नफ्याच्या तुलनेत जमा करावयाचे आहे, तसेच पुढे लागणारे भांडवल/अतिरिक्त भांडवल/गुंतवणूक आवश्यकतेनुसार सर्व भागीदारांकडून वाढविण्यांत येईल.

५) सदर संस्थेच्या व्यवसायाकरीता त्याचे मुख्य कार्यालय हे **"केळझरे बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स" प्लॉट नं. १७, रोड नं. ६, बजरंग नगर, मानेवाडा रोड,** नागपूर–४४००२७ येथे राहील. तसेच सर्व भागीदारांच्या संमतीने वेळोवळी ठरविल्याप्रमाणे इतर ठिकाणी कार्यालय सुरू करू शकतात.

६) सदर व्यवसायाचे वित्तीय वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील आणि त्याचप्रमाणे नफा व तोटा हा ठरवून आपसांत समान हिस्यात वाटण्यांत येईल.

७) सदर प्रत्येक भागीदार त्यांनी केलेल्या गुंतवणूकीवर/ खर्चावर १२ : टक्के प्रतीवर्ष प्रमाणे त्याच्या मुद्दल रक्कमेच्या नविन गुंतवणूक किंवा कर्जाच्या रक्कमेच्या संदर्भात हक्कदार आहेत किंवा इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१ च्या कलम ४०/ब्री/अ ने निश्चित केलेल्या रेटस् प्रमाणे प्रत्येक भागीदार हक्कदार आहे किंवा त्या कार्यकाळात विधी कायदयाप्रमाणे लागू होतील तसेच जमा पूंजीवर त्याच रेटस्प्रमाणे व्याज सुध्दा आकारले जाईल आणि वरील प्रमाणे विधी कायदयानुसार व्याज आकारले जाईल.

रोजच्या उत्पादनाच्या आधारे व्याज आकारले व दिले जाणार. संपूर्ण व्यय /खर्च/वजा करून जर नफा होत असेल तरच व्याज दिले जाईल.

८) अ) सर्व भागीदार हे कामकाजी भागीदार राहणार आहे आणि त्याच्या मोबदल्यात त्यांना कलम ४०/बी/अ इन्कम टॅक्स अ‍ॅक्ट प्रमाणे वार्षिक पगार दिला जाईल.

ब) वरील वार्षिक पगार वित्तीय वर्षाच्या शेवटी आकारण्यांत येईल आणि वरील वार्षिक पगार खालीलप्रमाणे विभागीत केल्या जाणार –

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती जयवंताबाई वि. नागो केळझरे, | १६.६६ टक्के |
| २) | कु. यशोदाबाई नागो केळझरे (लग्ना आधिचे नाव)<br>सौ. यशोदाबाई क्रिष्णराव भित्रे (लग्ना नंतरचे नाव) | १६.६६ टक्के |
| ३) | कु. मंजुषा उर्फ मंजु नागो केळझरे (लग्ना आधिचे नाव)<br>सौ. मंजुषा उर्फ मंजु रामभाऊ ढाकणे (लग्ना नंतरचे नाव) | १६.६६ टक्के |
| ४) | श्री. विनोद नागो केळझरे, | १६.६६ टक्के |
| ५) | श्री. मनोज नागो केळझरे, | १६.६६ टक्के |
| ६) | श्री. प्रमोद नागो केळझरे, | १६.७० टक्के |
| | | १०० टक्के |

क) सदर बुक नफ्याच्या अर्थ हा विस्थारना ३, कलम ४०/ब/इन्कम टॅक्स अ‍ॅक्ट १९६१ प्रमाणे लावलेला आहे किंवा त्या कार्यकाळात लागणाऱ्या विधी कायदयाप्रमाणे लागू होतील.

९) सदर भागीदाराचे हक्क व जबाबदारी हे क्लॉज १३ द इंडियन पार्टनरशिप अ‍ॅक्ट प्रमाणे सारखेच राहील. तसेच सदर भागीदार नफा व तोटा खालीलप्रमाणे वाटून घेतील.

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती जयवंताबाई वि. नागो केळझरे, | १६.६६ टक्के |
| २) | कु. यशोदाबाई नागो केळझरे (लग्ना आधिचे नाव)<br>सौ. यशोदाबाई क्रिष्णराव भित्रे (लग्ना नंतरचे नाव) | १६.६६ टक्के |
| ३) | कु. मंजुषा उर्फ मंजु नागो केळझरे (लग्ना आधिचे नाव)<br>सौ. मंजुषा उर्फ मंजु रामभाऊ ढाकणे (लग्ना नंतरचे नाव) | १६.६६ टक्के |
| ४) | श्री. विनोद नागो केळझरे, | १६.६६ टक्के |
| ५) | श्री. मनोज नागो केळझरे, | १६.६६ टक्के |
| ६) | श्री. प्रमोद नागो केळझरे, | १६.७० टक्के |
| | | १०० टक्के |

सदर संस्थेच्या वार्षिक हिशोबातील नफा व तोटा सर्व पेमेन्टस् दिल्यानंतर किंवा सर्व देय वजा करून निश्चित केल्या जाईल.

१०) सदर भागीदारी ही स्वईच्छा भागीदारी राहील कोणत्याही भागीदारीला निवृत्त व्हायचे असल्यास किंवा भागीदारी सोडायची असल्यास भारतीय भागीदारी कायदयाप्रमाणे नोटीस देवून सोडावी लागेल.

११) सर्व धनादेश व बिल भागीदार नं. २, ४ व ६ या तीन भागीदारापैकी कोनीही दोन भागीदारांच्या स्वाक्षरीने कार्यान्वित होतील.

१२) सदर भागीदाराच्या व्यवसायातील सर्व करार व पत्र यावर भागीदार नं. २, ४ व ६ या तीन भागीदारापैकी कोनीही दोन भागीदार सही करतील किंवा त्यांनी आम मुखत्यार म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीला सदर सर्व करार व पत्रांवर सही करता येईल.

१३) सदर भागीदारी संस्थेच्या व्यवसायाकरीता कर्जाची रक्कम/उसनी रक्कम फक्त भागीदारांच्या संमतीने व माहितीनेच, फक्त भागीदारी संस्थेच्या नावावर घेवू शकणार व तसेच उसनी रक्कम/कर्जाऊ रक्कम फक्त भागीदारी संस्थेच्या फायदयाकरीता आणण्यांत येईल आणि वरील रक्कमेचा उपभोग आपल्या व्यक्तीगत फायदयाकरीता करू शकणार नाही. व्यक्तीगत खर्चाकरीता कुठल्याही रक्कमेची उचल केल्यास ती भागीदाराच्या गुंतवणूकीतून वजा करण्यांत येईल.

१४) सदर भागीदारीत कुठलाही भागीदार हा इतर भागीदारांची लिखित संमती असल्याशिवाय खालील कुठलेही काम करणार नाही.

अ) सदर भागीदारी व्यवसायातील मालमत्तेची विक्री, गहाण करणे,
ब) सदर भागीदारी व्यवसायातील भांडवलातून पैसे उधार देणे,
क) सदर भागीदारी व्यवसायातील कुठल्याही प्रकारच्या मालमत्तेची विल्हेवाट लावणे किंवा विक्री करणे.

१५) सदर सर्व भागीदार एकमेकांसोबत खरे आणि प्रामाणिक राहतील आणि भागीदारी सुरू असतांना त्याच्या संपूर्ण कार्यकाळात भागीदारी व्यवसाय चालविणे आणि व्यवस्थापक मंडळ सांभाळण्यासाठी एकमेकांना कष्टाळूपणे व प्रामाणिकपणे त्यांचा

उपयोग करून घेतला जाईल आणि त्याचप्रकारे एकमेकांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना भागीदारी व्यवसायाचा हिशोब किंवा इतर माहिती देतील.

१६) सदर भागीदारी संस्थेचे आर्थिक कामकाजाचे वर्ष वित्तीय वर्षानुसार प्रत्येक वर्ष ३१ मार्चला बंद होतील. तसेच भागीदारी संस्थेच्या व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजाची व आर्थिक व्यवहारीची नोंद कार्यालयातील रजिस्टरमध्ये नियमीतपणे केली जाईल. तसेच प्रत्येक भागीदार हिशोब पुस्तिका व इतर कागदपत्राची तपासणी करू शकतील आणि सत्यप्रती सुध्दा प्राप्त करू शकतील. तसेच बॅकेचे संपुर्ण व्यवहार हे भागीदार नं. २, ४ व ६ हे पाहतील, जसे की खाते उघडणे त्याकरीता सहया करणे, लोन घेणे इत्यादी कामे वैगेरे, त्याच प्रमाणे धनादेशावर भागीदार नं. २, ४ व ६ या तीन भागीदारापैकी कोनीही दोन सहया करतील व ते धनादेश वटल्या जाईल.

१७) सदर व्यवसायाचे प्रथम वित्तीय वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च २०१७ हे राहील. सदर एका भागीदाराच्या मृत्युने किंवा निवृत्तीने वरील भागीदारी संस्था विसर्जित होणार नाही व जुने भागीदार मृतक भागीदाराच्या वारसांना भागीदार म्हणून प्रवेश देवु शकतील. भागीदाराच्या मृत्यु, निवृत्तीच्या सहा महिन्यांच्या आत त्याचे हिशोब व देणे–घेणे पूर्ण झालेले असावे. सदर भागीदारी संस्थेच्या नफ्यात निवृत्त भागीदार/मृत भागीदार हे त्यांच्या हिस्याकरीता फक्त निवृत्तीच्या तारखेपर्यत किंवा मृत्युच्या तारखेपर्यत हक्कदार राहतील त्यानंतर त्यांचे वारसदार हक्कदार राहतील. त्याच प्रमाणे कुठलाही भागीदार हा इतर भागीदारांची संमती असल्याशिवाय कुठल्याही व्यक्तीला भागीदार म्हणून समाविष्ट करू शकणार नाही.

१८) सदर भागीदारी व्यवसायाबद्दलचे एकमेकांमधील झगडे, तंटे, भांडण, हे बोर्ड ऑफ ऑरबिट्रेटर समोर सोडवतील व प्रत्येक भागीदार हा आपला एक प्रतिनिधी नियुक्त करतील आणी बोर्ड ऑफ ऑरबिट्रेटरचा निर्णय हा अंतिम व सर्व भागीदारांना मान्य राहील.

१९) जे मुद्दे भागीदारांच्या अटीमध्ये समाविष्ट नसतील ते द इंडीयन पार्टनरशिप ॲक्ट १९३२ व सोबत त्या अंतर्गत आजपर्यतच्या त्यातील सुधारणा, दुरूस्तीच्या तरतुदीप्रमाणे/ अटीप्रमाणे मंजूर केल्या जातील.

२०) द इंडीयन पार्टनरशिप ॲक्ट १९३२ क्लॉज नं. ८ प्रमाणे वरीलपैकी एखादा भागीदार दुसऱ्या संस्थेचा भागीदार बनु शकतो.

२१) जर एखादया भागीदारी व्यवसायाची कर्जाऊ किंवा आगावु घेतलेली रक्कम घेणे असल्यास त्यावर १८ टक्के दराने व्याज घेण्यांत येईल किंवा विधी कायदयाप्रमाणे अथवा इन्कम टॅक्स ॲक्ट नुसार घेण्यांत येईल. जे वेळोवेळी भागीदार ठरवतील त्याप्रमाणे देय राहील.

खालील साक्षीदारांच्या समक्ष वरील भागीदारांनी हे भागीदारी करारपत्र बनविले आहे व दिनांक ०९/१२/२०१६ रोजी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.



साक्षदार :

भागीदारांच्या स्वाक्षऱ्या

१) Deepak S. Zade
H. 84, Lavkush Nagar
Nagpur.





२) M. Borikar
Adv. Mangala S. Borikar
mhada Colony LIG-52
Hingna Road Nagpur

१) श्रीमती जयवंताबाई वि. नागो केळझरे,

२) कु. यशोदाबाई नागो केळझरे (लग्ना आधिचे नाव)
सौ. यशोदाबाई क्रिष्णराव भित्रे (लग्ना नंतरचे नाव)



सौ मंजुषा रामभाऊ ढाकणे

३) कु. मंजुषा उर्फ मंजु नागो केळझरे (लग्ना आधिचे नाव)
सौ. मंजुषा उर्फ मंजु रामभाऊ ढाकणे (लग्ना नंतरचे नाव)



४) श्री. विनोद नागो केळझरे,



kelzare

५) श्री. मनोज नागो केळझरे,



Kelzare

६) श्री. प्रमोद नागो केळझरे,